महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●




मंगळवार १६ जून २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ | अंक : २९५ | किंमत २ रुपये | 7499615933

# अभिजीत दिपकेंना मारहाण, जयपूरमध्ये नेमकं काय घडलं?

## कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना मारहाण करण्यात आली आहे, जयपूरमधील आंदोलनावेळी ही घटना घडली आहे.

**लोकनेता न्युज नेटवर्क**

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना मारहाण करण्यात आली आहे, जयपूरमधील आंदोलनावेळी ही घटना घडली आहे. आंदोलन सुरू असताना एका अज्ञात तरुणाने अचानक अभिजीत दीपके यांच्यावर हल्ला केला. त्या तरुणाने अभिजीत यांना एकामागून एक कानशिलात लगावल्या. या घटनेनंतर अभिजीत यांच्या समर्थकांनी तात्काळ संबंधित तरुणाला पकडले आणि त्याला मारहाण केली. या घटनेनंतर परिसरात मोठा गोंधळ आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी धावपळ उडाली. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत असल्याची माहिती समोर आली आहे.

जयपूरमधील आंदोलनावेळी हल्ला

समोर आलेल्या माहितीनुसार जयपूरमधील शहीद स्मारकावर कॉकरोच जनता पार्टीचे कार्यकर्ते सोमवारी आंदोलन करत होते. याचदरम्यान पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके या ठिकाणी पोहोचले. त्यावेळी एका तरुणाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. त्या तरुणाने अभिजीत दिपके यांच्या कानशिलात लगावल्या. हल्ल्यानंतर त्याने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर कार्यकर्त्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. यावेळी अभिजीत दिपके यांनी कार्यकर्त्यांना शांतता राखण्याचे आवाहन केले. आरोपीचा शोध सुरू



या घटनेनंतर पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेतली असून हल्लेखोर तरुणाचा शोध सुरू केला आहे. या तरूणाने हल्ला का केला याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात असून आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे.

### शिक्षण आणि बेरोजगारीच्या मुद्द्यांवर आंदोलन

कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा, भरती परीक्षांमधील गैरव्यवहार आणि वाढती बेरोजगारी या मुद्द्यांवर आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी, युवक, पालक आणि महिलांनी सहभाग घेतला होता. मात्र या आंदोलनात मोठी गर्दी झाल्याने मोबाईल चोरीच्या घटनाही समोर आल्या आहेत. अनेकांनी आपले मोबाईल फोन हरवल्याची तक्रार केली. यानंतर आयोजकांनी व्यासपीठावरून नागरिकांना आपल्या मोबाईलसह मौल्यवान वस्तूंची काळजी घेण्याचे आवाहन केले. तसेच गर्दीत सक्रिय असलेल्या चोरट्यांपासून सावध राहण्याचा इशाराही देण्यात आला. या घटनांमुळे आंदोलनस्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

---

## आलिशान कारच्या स्टेपनीखाली ९.६० किलो गांजा; आंतरराज्य तस्कर जेरबंद



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छ.संभाजीनगर,दि.४:छत्रपती संभाजीनगर शहरात जालन्याहून गांजाची तस्करी करणाऱ्या बद्रीनाथ प्रल्हादराव खुरमोटे या आंतरराज्य तस्कराला राज्य उत्पादन शुल्क विभागाने जालना रोडवर अटक केली. आरोपीच्या कारमधील स्टेपनीखाली लपवून ठेवलेला 9.60 किलो गांजा जप्त करण्यात आला. या कारवाईत 4.53 लाखांचा गांजा,कारसह एकूण 10.53 लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा गांजा शहरातील पेडलर्सना 25 ते 50 हजार रुपये किलो दराने विकत असल्याची माहिती समोर आली असून त्याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

----------------------

## मृग नक्षत्र कोरडे जाण्याची शक्यता; वैजापूर तालुक्यातील शेतकरी चिंतेत...

**लोकनेता न्युज नेटवर्क**
वैजापूर प्रतिनिधी अर्जुन शिंदे

वैजापूर तालुक्यात अद्यापही समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसाळ्याची सुरुवात मानल्या जाणाऱ्या मृग नक्षत्रात पाऊस पडेल, या आशेवर शेतकरी होते. मात्र मृग नक्षत्र संपत आले तरीही तालुक्यात अनेक भागांमध्ये अपेक्षित पर्जन्यवृष्टी झालेली नाही.

खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी शेतीची मशागत पूर्ण करून बियाणे, खते आणि इतर कृषी साहित्याची खरेदी केली आहे. काही शेतकऱ्यांनी पावसाच्या आशेवर पेरणीची तयारीही पूर्ण केली आहे. परंतु आकाशात ढग दिसत असले तरी पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, "दरवर्षी मृग नक्षत्रात पावसाची सुरुवात होत असते. यंदा मात्र पावसाने पाठ फिरविल्याने पेरण्या रखडल्या आहेत. बियाणे आणि खतांसाठी मोठा खर्च केला असून, वेळेत पाऊस न झाल्यास आर्थिक संकट आणखी गडद होईल."



पावसाअभावी विहिरी, शेततळे आणि जलसाठ्यांमध्येही अपेक्षित पाणी साचलेले नाही. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीसाठी पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तालुक्यातील शेतकरी आता आकाशाकडे डोळे लावून बसले असून, लवकरात लवकर दमदार पाऊस पडावा आणि खरीप हंगामाला सुरुवात व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत. मृग नक्षत्र कोरडे जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांवर अनिश्चिततेचे सावट पसरले आहे.

---

## म सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी गायत्री मंत्राच्या घोषात केले कडबनवाडीत वडारोपण!



**लोकनेता न्युज नेटवर्क**

*इंदापूर: सह्याद्री देवराईचे संस्थापक आणि प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी रविवारी (१४ जून) कडबनवाडी (ता. इंदापूर) येथील 'ऑक्सिजन पार्क'ला भेट दिली. यावेळी त्यांनी येथील निसर्गरम्य गवताळ कुरण सफारीचा आनंद घेतला.या भेटीदरम्यान सयाजी शिंदे यांच्या हस्ते उद्यानात वडाच्या झाडाची लागवड करण्यात आली. वृक्षारोपण करताना त्यांनी 'गायत्री मंत्र' म्हणाला आणि उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. "झाडे लावा, झाडे जगवा, झाडाचे गुण गाऊ, झाडाचे गुण घेऊ," असा मोलाचा आणि पर्यावरणपूरक संदेश त्यांनी यावेळी नागरिकांना दिला.या प्रसंगी भजनदास पवार यांनी सयाजी शिंदे यांना संपूर्ण वन उद्यानाच्या निर्मितीबद्दल आणि वैशिष्ट्यांबद्दल सविस्तर माहिती दिली. अभिनेत्याच्या या पर्यावरण दौऱ्यामुळे स्थानिक पर्यावरण प्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी भाग्यश्री ठाकूर, सरपंच प्रशासक दादासो जाधव, पंचायत अधिकारी दादासाहेब गावडे, कांतीलाल गावडे, बाबुराव गावडे, महेश गावडे श्रेयस शिंगाडे यांच्यासह परिसरातील पर्यावरण प्रेमी व ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## मेळघाटचे माजी आमदार पटल्या ( गुरुजी ) मावस्कर यांचे दु:खद निधन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
धारणी प्रतिनिधी - रजनिश साकले

धारणी: मेळघाट विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि ज्येष्ठ समाजसेवक पटल्या (गुरुजी) मावस्कर यांचे सोमवार दिनांक १५ जून २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने संपूर्ण मेळघाट परिसरात आणि राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

पटल्या गुरुजी मावस्कर यांची प्रकृती काही काळापासून अस्वस्थ होती. आज अखेर त्यांनी वयाच्या उत्तरार्धात अखेरचा श्वास घेतला. त्यांची अंत्ययात्रा त्यांच्या सिव्हिल लाईन्स,



धारणी येथील राहत्या घरातून निघुन धारणी येथील हिंदू स्मशान भूमी, मधुवा नाला येथे त्यांच्या पार्थिवावर सामाजिक रितीरिवाजांनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

**प्रतिक्रिया**

"भाजपचे नेते माजी आमदार आदरणीय पटल्या (गुरुजी) मावस्कर यांच्या निधनाने भाजप परिवाराने एक खंबीर नेतृत्व गमावला आहे. त्यांनी आयुष्यभर सर्वसामान्यांच्या हितासाठी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील. ईश्वर दिवंगत आत्म्यास सद्गती देवो व मावस्कर कुटुंबाला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो. भावपूर्ण श्रद्धांजली!"

**— श्री. विवेकजी नवलाखे (भाजपा शहर अध्यक्ष, धारणी)**

"आदरणीय पटल्या (गुरुजी) मावस्कर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दु:खद आहे. त्यांनी भाजपचे जनसेवक नेते म्हणून लोकांसाठी अविरत कार्य केले. हि कधीही भरून न निघणारी हानी आहे.भावपूर्ण श्रद्धांजली!"

**— श्री.कमलेश भगत सरचिटणीस (महामंत्री ) भाजपा शहर मंडळ धारणी**

---

## अज्ञातानी रात्रीतून जमीनदोस्त केली भूमी अभिलेख कार्यालयाची इमारत शासकीय मालमत्तेच्या सुरक्षेवर उपस्थित झाले प्रश्नचिन्ह

**लोकनेते न्यूज नेटवर्क**
किनवट प्रतिनिधि,शेख शौकत

शहरात एक अत्यंत धक्कादायक आणि आश्चर्यकारक प्रकार समोर आला आहे. सरस्वती कॉलनी-मांडवा रोड परिसरातील भूमी अभिलेख कार्यालयाची शासकीय इमारत, जी अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत होती, ती अचानक रातोरात जमीनदोस्त करण्यात आल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तसेच शासकीय मालमत्तांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सन १९९९ मध्ये शासनाने सुमारे ५ गुंठे जागा खरेदी करून त्या ठिकाणी भूमी अभिलेख कार्यालयाची स्थापना केली होती. काही वर्षे या इमारतीतून कार्यालयीन कामकाजही सुरू होते. मात्र, अपेक्षेपेक्षा लवकर इमारतीची अवस्था जिर्ण झाल्याने कार्यालय इतरत्र हलविण्यात आले. त्यानंतर ही इमारत अनेक वर्षे बंद व दुर्लक्षित अवस्थेत पडून होती. मात्र आता हीच इमारत एका नव्या वादामुळे चर्चेत आली आहे. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, अज्ञातांनी रातोरात जेसीबीच्या सहाय्याने संपूर्ण इमारत पाडून टाकली. सध्या घटनास्थळी केवळ विटा आणि ढिगाऱ्याचे अवशेष शिल्लक आहेत.

या संदर्भात भूमी अभिलेख विभागाच्या उपअधीक्षकांशी संपर्क साधला असता त्यांनी स्पष्ट माहिती देण्याचे टाळले. 'या प्रकरणाबाबत
मला कोणतीही माहिती नाही,' असे सांगत त्यांनी हात झटकले. विभागाच्या या भूमिकेमुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे,



शासकीय इमारत पाडून इतके दिवस उलटून गेल्यानंतरही संबंधित विभागाने अद्याप पोलिसांत तक्रार का दाखल केलेली नाही? जर शासकीय मालमत्ताच सुरक्षित नसेल, तर सामान्य नागरिकांच्या मालमत्तेचे काय ?

या घटनेमुळे शहरात चर्चांना उधाण आले असून नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. कोणत्याही प्रशासकीय परवानगीशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणावर अशी कारवाई होणे शक्य आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. तसेच या प्रकरणामागे जमीन माफिया आणि संबंधित विभागातील काही व्यक्तींची मिलीभगत तर नाही ना, अशीही चर्चा सुरू आहे. तथापि, या सर्व प्रश्नांची उत्तरे केवळ निष्पक्ष पोलिस चौकशीतूनच समोर येऊ शकतात. मात्र त्यासाठी संबंधित विभागाने प्रथम पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल करणे आवश्यक आहे. आता या प्रकरणात प्रशासन कोणती भूमिका घेते आणि रात्रीतुन जमीनदोस्त झालेल्या या शासकीय इमारतीचे गूढ कधी उलगडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

# ग्रेट निकोबारच्या अस्तित्वाची लढाई “

अंदमान व निकोबार द्विपसमूह म्हणजे पृथ्वीवरील अदिम जीवसृष्टीचे जिवंत उदाहरण आहे.या ग्रेट निकोबार बेटाचा सिंगापूरच्या धर्तीवर अंदाजे ७२ हजार कोटी रूपये खर्च करून विकास केला जाणार आहे.या बेटावर एक आंतरराष्ट्रीय कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल उभारण्यात येणार आहे. लष्करी आणि नागरी अशा दोन्ही वापरांसाठी एका अत्याधुनिक हरितक्षेत्र विमानतळाची निर्मिती केली जाणार आहे.गॅस आणि सौरऊर्जेवर आधारित वीज निर्मिती केंद्र स्थापन केले जाणार आहे.पर्यटनाला आणि रोजगाराला चालना देण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधांचे एक संपूर्ण शहर इथे वसवले जाणार आहे.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने मंजुरी दिलेल्या या बेटाच्या एकूण क्षेत्रांपैकी तब्बल ८१.७४ टक्के भाग राष्ट्रीय उद्याने, राखीव जंगले व आदिवासी संवर्धन क्षेत्र म्हणून कायम ठेवले जाणार आहे.या संपूर्ण प्रकल्पातून जवळपास एक लाख रोजगारनिर्मिती होईल. जागतिक व्यापार,देशाचे लष्करी सामर्थ्य,सुरक्षा आणि आर्थिक प्रगतीसाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल,अशी अपेक्षा सरकार व्यक्त करत आहे.

दुसरीकडे मात्र या प्रकल्पामुळे ग्रेट निकोबारमधील अंदाजे ९ लाख ते दीड कोटी जुनी आणि दुर्मिळ झाडे कापली जाणार आहेत. या प्रकल्पाचा थेट फटका येथील दुर्मिळ आणि संवेदनशील वन्यजीवांना बसणार आहे.गॅलाथिया हे जगातील सर्वात मोठ्या लेदरबॅक कासवांचे हक्काचे वीण केंद्र असून ते कायमचे नष्ट होईल. तसेच, निकोबार मेगापोड पक्ष्यासह याच भागात आढणारे दुर्मिळ जीव नामशेष होतील. पृथ्वीच्या भूतकाळाचे जिवंत साक्षीदार बनलेल्या शोम्पेन आणि निकोबारी जमाती नामशेष झाल्यास मानवी उत्क्रांतीचा इतिहासच पुसला जाईल.या संपूर्ण भौगोलिक क्षेत्राची संवेदनशीलता लक्षात घेता,अंदमान-निकोबार हा परिसर भूकंपप्रवण क्षेत्रात मोडतो आणि २००४ च्या भीषण त्सुनामीत या बेटाचा काही भाग समुद्रात खचल्याचा इतिहास ताजा आहे.अशा अत्यंत अस्थिर आणि नाजूक भूभागावर अब्जावधी रूपयांचे सिमेंटचे साम्राज्य उभे करणे हे एक प्रकारे आत्मघातकी पाऊल ठरू शकते,असा इशारा भूगर्भशास्त्रज्ञांनी दिला आहे.नवीन प्रकल्पामुळे ११५ मीटर उंचीच्या दोन टेकड्या तोडाव्या लागतील.तसेच २२५ संरक्षित जंगल आणि १३० एकर ‘ डीम्ड फॉरेस्ट ‘ वर थेट अतिक्रमण होईल, ज्यामुळे आयलंड कोस्टल झोन रेग्युलेशनमधील अत्यंत संवेदनशील क्षेत्र धोक्यात येईल.

या प्रकल्पाविरोधात पर्यावरणतज्ज्ञ आणि विरोधी पक्षांनी धोक्याची घंटा वाजवली आहे.काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी ग्रेट निकोबार बेटाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील आदिवासी समूहाच्या प्रतिनिधींशी संवाद साधला आहे. तसेच माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी सातत्याने पत्रव्यवहार करून केंद्र सरकारच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला कडाडून विरोध दर्शविला आहे.पर्यावरणप्रेमी व विरोधक यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे.हा संघर्ष केवळ राजकीय किंवा प्रशासकीय राहिलेला नसून,तो ‘मानवाचा भोतिक विकास ‘ विरूद्ध ‘ निसर्गाचा आदिम श्वास ‘ या दोन टोकांमधील अस्तित्वाची लढाई बनला आहे. कॅार्पोरेट नफ्याच्या आणि संकुचित आर्थिक चौकटीच्या बाहेर पडून,पारदर्शक संवादातून आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करूनच या सामरिक प्रकल्पाबाबत एक पाऊल पुढे टाकणे हेच भारताच्या दीर्घकालीन हिताचे ठरेल. व्यापारी रिअल इस्टेट आणि पर्यटनाच्या नावाखाली निसर्गाचा संहार थांबवून,हा प्रकल्प केवळ आणि केवळ लष्करी व नोदलाच्या धोरणात्मक गरजांपुरताच मर्यादित ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे.

अंतिम सत्य हेच आहे की,निसर्गाचा कोप जेव्हा होतो,तेव्हा माणसाने कमावलेला सगळा विकास एका महापुरात किंवा चक्रीवादळात वाहून जाण्यास क्षणाचाही वेळ लागत आहे. आंधळा विरोध आणि हट्टी विकास या दोन्ही टोकाच्या भूमिका सोडून पर्यावरणीय संवेदनशीलता आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुवर्णमध्य साधणे हाच देशहिताचा तोडगा आहे.आंतरराष्ट्रीय बंदराची आणि लष्करी तळाची रचना करताना निसर्गाला किमान हानी पोहोचेल अशा इको-इंजिनिअरिंग पद्धतींचा काटेकोर वापर केला पाहिजे आणि कासवांचे वीण क्षेत्र,तसेच आदिम शोम्पेन जमातींचा राखीव भूप्रदेश यांना प्रकल्पाच्या नकाशातून पूर्णपणे वगळून तो भूभाग ‘ ना विकास क्षेत्र ‘घोषित करण्याची गरज आहे. ग्रेट निकोबारच्या अस्तित्वाच्या लढाईत आपण हे हरित नंदनवन गमावले,तर येणाऱ्या पिढ्या आपल्याला कधीच माफ करणार नाहीत

# तिगावच्या भूमिपुत्राचा राज्यस्तरीय गौरव : संकेत सुमन तुकाराम सानप यांना ‘समाज भूषण पुरस्कार 2026’ प्रदान””गरीबांच्या मदतीसाठी झटणाऱ्या युवा समाजसेवकाचा राज्यस्तरीय गौरव”

### गोरगरीब रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून लाखो रुपयांची मदत मिळवून देणाऱ्या युवा समाजसेवकाचा राहुरी कृषी विद्यापीठात सन्मान

**लोकनेता न्युज नेटवर्क**
“ प्रदीप मुंडे

संगमनेर तालुक्यातील तिगाव गावचे सुपुत्र शेतकरी कुटुंबातील युवा तरुण सध्या मुंबई सारख्या शहरात गोरगरीब रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळवून देत आहेत शासनाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी कार्यरत असलेले युवा समाजसेवक संकेत तुकाराम सानप यांना राज्यस्तरीय “समाज भूषण पुरस्कार २०२६” प्रदान करण्यात आला. राहुरी कृषी विद्यापीठ येथे आधार फाऊंडेशन व एसआर 24 न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान



प्रदान करण्यात आला.
अत्यंत कमी वयात शासकीय व प्रशासकीय विभागामध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे संकेत सानप हे आरोग्यदुत साक्षात देवदूत बनत शासनाच्या माध्यमातून राज्यभरातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, रुग्ण आणि गरजू कुटुंबांना मदत करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. विशेषतः मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या अनेक गोरगरीब रुग्णांना लाखो रुपयांची आर्थिक मदत मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.
त्यांच्या सामाजिक बांधिलकीची आणि आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत आधार फाऊंडेशन व एसआर 24 न्यूज यांच्या वतीने त्यांना “समाज भूषण पुरस्कार २०२६” देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार स्वीकारताना उपस्थित मान्यवरांनी संकेत सुमन तुकाराम सानप यांच्या कार्याचे कौतुक करत, कमी वयात संपूर्ण महाराष्ट्रात मोठे संपर्क जाळे निर्माण करून समाजहितासाठी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी राहुरी कृषी विद्यापीठ येथे उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.
या सन्मानामुळे तिगाव गावासह संगमनेर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार आणि नागरिकांकडून संकेत सुमन तुकाराम सानप यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यापुढेही समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना आणि मदत पोहोचविण्यासाठी कार्यरत राहणार असल्याची भावना संकेत सानप यांनी यावेळी व्यक्त केली

# माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी आणि सदस्यांचा गौरव!

**लोकनेते न्यूज नेटवर्क**
इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव

इंदापूर: इंदापूर तालुक्यातील शेळगाव ग्रामपंचायतीने आपल्या उत्कृष्ट कारभाराच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात’ शेळगाव ग्रामपंचायतीने इंदापूर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. उर्मिला लक्ष्मण शिंगाडे यांना अत्यंत प्रतिष्ठेचा ‘लोकमत सरपंच ऑफ द इयर’ या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. या दुहेरी यशाबद्दल आज, १५ जून रोजी माजी सहकार मंत्री माननीय हर्षवर्धनजी पाटील साहेब यांच्या



इंदापूर येथील निवासस्थानी शेळगावच्या सर्व लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.शेळगाव ग्रामपंचायतीने मिळवलेले हे यश संपूर्ण तालुक्यासाठी भूषणावह आहे. या यशाची दखल घेत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आज विशेष सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. याप्रंगी त्यांनी सरपंच सौ. उर्मिला लक्ष्मण शिंगाडे, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामपंचायत अधिकारी यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान केला. शेळगावचा हा पॅटर्न इतर गावांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील प्रथम क्रमांक आणि सरपंच ऑफ द इयर पुरस्कारामुळे शेळगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.
शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शक कारभार आणि गावकऱ्यांचा सहभाग यांमुळेच हे यश शक्य झाल्याची भावना सरपंच सौ. उर्मिला शिंगाडे यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. या यशामुळे शेळगाव ग्रामपंचायतीवर संपूर्ण जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.
यावेळी सरपंच सौ. उर्मिला शिंगाडे, उपसरपंच सौ.रेश्मा जाधव, ग्रामपंचायत सदस्या सौ. स्वाती शिंगाडे, ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत जगताप, ॲड. लक्ष्मणराव शिंगाडे, अंबादास शिंगाडे, राजेंद्र चवरे,तात्यासो शिंगाडे, मनोहर शिंगाडे, प्रशांत भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# ज,क.म.विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तके,गुलाबपुष्प देऊन स्वागत व वृक्षारोपण;

नायगाव प्रतीनिधी

शाळेच्या पहिल्याच दिवशी पर्यावरण संवर्धनाचा जनता हायस्कुल कनिष्ठ महा विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प आणि पाठयपुस्तके देऊन स्वागत संस्थेचे अध्यक्ष खा.रवींद्र पाटील चव्हाण,प्राचार्य बाबासाहेब शिंदे आणि शिक्षकांच्या हस्ते झाले.विद्यार्थी आणि शिक्षकांच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आणि शाळेच्या पहिल्याच दिवशी झालेल्या या उपक्रमामुळे परिसरात एक वेगळाच उत्साह पाहायला मिळाला.कार्यक्रमाची सुरुवात एज्युकेशन सोसायटी नायगाव चे अध्यक्ष खा. प्रा. रवींद्र पाटील चव्हाण कोष्याध्यक्ष गोविंदराव मेथे,महाविद्यालयाचे प्राचार्य बाबासाहेब शिंदे यांच्या हस्ते रोप लावून झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी शाळेच्या पटांगणात आणि परिसरात कडूनिंब, गुलमोहर, चिंच आणि करंज अशी विविध प्रकारची झाडे लावली. प्रत्येक इयत्तेला एका झाडाची जबाबदारी देण्यात आली असून, वर्षभर त्या झाडाचे संगोपन करण्याचे विद्यार्थ्यांनी मान्य केले.याप्रसंगी बोलताना खा. रवींद्र पाटील चव्हाण यांनी सांगितले की, “केवळ झाडे लावणे पुरेसे नसून ती जगवणे आपली जबाबदारी आहे. पहिल्याच दिवशी पर्यावरण संवर्धनाचा हा धडा विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाबद्दल प्रेम निर्माण करेल.”कार्यक्रमाला उपमुख्याध्यपक हणमंत शिंदे, उप प्राचार्य माधव सोमावार, पर्यवेक्षक



उत्तम पाटील, पर्यवेक्षिका सौ शोभा शिंदे प्रा. पी.डी. जाधव पर्यवेक्षक बी आर शेख, रिठेवाड बी.एन. वसंत माने,गंगाधर मिरकुटे शरद जोनकल्ले, राजेश पाटील यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण पूरक घोषणा देत आणि झाडांना पाणी घालत विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा आनंद घेतला. शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व पालकांकडून कौतुक होत आहे. यावेळी सरपंच सौ. उर्मिला शिंगाडे, उपसरपंच सौ.रेश्मा जाधव, ग्रामपंचायत सदस्या सौ. स्वाती शिंगाडे, ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत जगताप, ॲड. लक्ष्मणराव शिंगाडे, अंबादास शिंगाडे, राजेंद्र चवरे,तात्यासो शिंगाडे, मनोहर शिंगाडे, प्रशांत भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# देगलूरच्या उपजिल्हा रुग्णालयात शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने “गोंधळ “आंदोलन संपन्न

**लोकनेता न्युज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

देगलूर --- उपजिल्हा रुग्णालयात नियुक्ती असलेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी महीन्यातुन 5 दिवस हजर न रहाता महीन्यातील सर्व दिवस हजर राहून दररोज गोर गरीब दिन दलित शेतकरी शेतमजूर यांना आरोग्य सेवा द्यावी व 100 खाटाचे रुग्णालय त्वरित कार्यान्वित व्हावे या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दि.15 जुन रोजी उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात गोंधळ आंदोलन शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ पेरके व वैद्यकीय अधिक्षक डॉ देवणीकर यांच्या लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन समाप्त करण्यात आले यावेळी शिवसेना देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, माजी उपजिल्हा प्रमुख माजी नागनाथ वाडेकर , शहर प्रमुख भगवान जाधव,



युवासेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल नेटवर्कर प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, शहर प्रमुख बाबुराव मिनकीकर,युवा सेना उपजिल्हाप्रमुख राहुल सोनकांबळे, शहर संघटक संतोष कांबळे, युवा सेना शहर प्रमुख विनोद सोनकांबळे, अल्पसंख्याक सेनेचे तालुका अध्यक्ष सय्यद मीर, अल्पसंख्याक सेनेचे शहर प्रमुख ईस्मालखान पठाण, शिवसेना उपतालुकाप्रमुख मानाजी पाटील लोणे लोणीकर, उपतालुकाप्रमुख व्यंकट रेड्डी आलूरे शहापूर कर, , विभाग प्रमुख गंगाधर पाटील चाकूरकर, विभाग प्रमुख राजेंद्र उल्लेवार मुजळगेकर, गट प्रमुख,हाणमंत पाटील शिवणीकर, उपविभाग प्रमुख हाणमंत राजुरे लख्खेकर, विभाग प्रमुख किशन पाटील शहापूरकर,गट प्रमुख तुकाराम निवळे काठेवाडीकर, गट प्रमुख नागनाथ विभुते चैनपुरकर, गटप्रमुख परमेश्वर कोकणे, रमेश कोकले, शाहीर माणिकराव कोकले, किशन राजुरे बल्लूरकर, गंगाधर वकंलवार, संजय पाटील मंगरुळे,लख्खेकर, अल्पसंख्याक सेनेचे उपाध्यक्ष बाबा खान पठाण, राजु जाधव, शिवाजी सोनकांबळे मुजळगेकर, अर्जुन लुटे, अल्लापुरकर अशोक घाटे, शिवाजी चव्हाण मानुर तांडा, शिवाजी कटकुले, मारोती जाधव, दिंगाबर बोयावार, उमाकांत पाटील डोंगरे, हाणमंत मंगरुळे, विठ्ठल बुक्कावार, लक्ष्मण भालेराव, माजी सरपंच , मारोतराव कोकणे वझरगेकर, निपाणीसावरगावचे माजी सरपंच भुजंगराव कोकणे, काशीनाथ कोकणे, बिलोली युवा सेना उपतालुकाप्रमुख भास्कर भालेराव,सुंडगीचे उपसरपंच दिलिप कांबळे, गंगाधर वाघमारे नंदुर, गट प्रमुख जाधव हाळीकर, उमाकांत पाटील डोंगरे, गौतम फिरंगे आदीसह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थितीत होते, यावेळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक सुर्य मोहन बोलेमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गोपाळ सुर्यवंशी, पोलिस उपनिरीक्षक शिवाजी आडेकर, पोलिस उपनिरीक्षक भगवान मोरे, गुप्तहेर विष्णूकांत चामलवाड, मच्छिंद्र पुरी, गणेश बोदमवाड,जगताप अप्पा, माधव मरगेवाड, आदींनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# गडचिरोलीत श्रमशक्ती व असंघटित उद्योग सर्वेक्षणाचा शुभारंभ

## नागरिकांनी क्षेत्रीय पथकांना सहकार्य करावे - जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा

### *विकसित महाराष्ट्रासाठी जिल्हानिहाय अचूक माहिती संकलनाला सुरुवात*

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
सेवा पवार
जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली.

गडचिरोली, दि. १५ : राज्याच्या ‘विकसित महाराष्ट्र’ या संकल्पनेला गती देण्यासाठी प्रथमच जिल्हानिहाय श्रमशक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण राबविण्यात येत असून, गडचिरोली जिल्ह्यात या महत्त्वपूर्ण सर्वेक्षण मोहिमेचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. या सर्वेक्षणातून जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे वास्तव चित्र समोर येणार असून नागरिकांनी सर्वेक्षण पथकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

जिल्हास्तरावरील आर्थिक, सामाजिक आणि रोजगारविषयक निर्देशकांची विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून विकास नियोजन अधिक परिणामकारक करण्याच्या उद्देशाने हे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. राज्य शासनाने जिल्ह्याच्या विकासाला राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा केंद्रबिंदू मानत प्रत्येक जिल्ह्याची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्यावर भर दिला आहे. त्यानुसार रोजगार, बेरोजगारी, श्रमशक्तीचा सहभाग, असंघटित क्षेत्रातील उद्योगांची स्थिती, उत्पन्नाचे स्रोत तसेच विविध सामाजिक-आर्थिक बाबींची सविस्तर माहिती या सर्वेक्षणाद्वारे गोळा केली जाणार आहे.

या सर्वेक्षणातून उपलब्ध होणारी माहिती राज्य व जिल्हास्तरावरील विकास आराखडे तयार करण्यासाठी, विविध धोरणे निश्चित करण्यासाठी तसेच कल्याणकारी योजनांचे प्रभावी नियोजन करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील रोजगाराच्या संधी, उद्योजकतेची स्थिती, असंघटित क्षेत्रातील उद्योगांची वाढ आणि नागरिकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास



या माध्यमातून होणार असल्याने विकास नियोजनाला अधिक वैज्ञानिक आधार मिळणार आहे.
राज्यभरात राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत एकूण ६ हजार ८२८ नमुना घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सर्वेक्षणासाठी २७६ अन्वेषक व निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावर माहिती संकलनाचे काम करण्यात येणार आहे. संकलित आकडेवारीचा उपयोग ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावरील विकास योजनांच्या आखणीसाठी करण्यात येणार आहे.

सर्वेक्षणाचे क्षेत्रीय कामकाज आयपीएसओएस रिसर्च, मुंबई या संस्थेमार्फत अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. सर्वेक्षणासाठी नियुक्त पथके घरभेटी देऊन नागरिकांकडून माहिती संकलित करणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही शंका न बाळगता अचूक व सत्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उप आयुक्त ज्ञानेश्वर खडतकर यांनी केले आहे.

जिल्ह्यातील विकासाचे वास्तव चित्र समोर आणून भविष्यातील नियोजन अधिक परिणामकारक करण्यासाठी हे सर्वेक्षण महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# स्मार्ट मीटर लादण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाही; नागरिकांचा महावितरणला थेट इशारा!



### संमतीशिवाय मीटर बदलल्यास तीव्र विरोधाचा इशारा;

### गडचांदूरमध्ये वीज ग्राहकांचे निवेदन

**दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क**
चंद्रपूर/सिद्धेश्वर केंद्रे

गडचांदूर महावितरणकडून वीज ग्राहकांच्या घरांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्याच्या सुरू असलेल्या प्रक्रियेविरोधात गडचांदूर परिसरातील नागरिकांनी आक्रमक भूमिका घेत उपविभागीय अभियंता, महावितरण यांना निवेदन सादर केले. ग्राहकांची संमती न घेता स्मार्ट मीटर बसविण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा नागरिकांनी दिला आहे.
निवेदनात म्हटले आहे की, महावितरणकडून एसएमएस आणि व्हॉट्सॲपद्वारे स्मार्ट मीटर बसविण्याबाबत सूचना दिल्या जात असल्या तरी या प्रक्रियेसंदर्भात अनेक शंका आणि आक्षेप कायम आहेत. स्मार्ट मीटर बसविण्याबाबत स्पष्ट कायदा, अधिसूचना किंवा अधिकृत आदेश नसताना ग्राहकांवर ही योजना लादली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.
तसेच स्मार्ट मीटर संदर्भातील विविध जनहित याचिका न्यायालयात प्रलंबित असताना घाईघाईने मीटर बसविण्याची मोहीम राबविणे अयोग्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या कार्यरत असलेले मीटर व्यवस्थित सुरू असताना ग्राहकांची लेखी संमती न घेता मीटर बदलणे अन्यायकारक असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.
स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीज बिलात वाढ झाल्याच्या तक्रारी राज्यभरातून समोर येत असल्याचा दावा करत, यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना आर्थिक फटका बसत असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे. त्यामुळे ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध कोणतेही मीटर बदलू नयेत, अशी ठाम मागणी करण्यात आली.
याशिवाय ग्राहकांच्या मालकीच्या जागेत परवानगीशिवाय प्रवेश करून मीटर बदलण्याचा प्रयत्न झाल्यास त्यास तीव्र विरोध केला जाईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. महावितरणने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम तातडीने थांबवावी, अशी मागणी करण्यात आली.
निवेदन सादर करताना मनोज भोजेकर, संतोष महाडोळे, मनोहर सातपुते, हंसराज चौधरी, विक्रम येरणे, अक्षय गोरे, दिनेश मापुलवार, कीर्तीकुमार करमणकर, महादेव कवलकर, वसंता रासेकर, दिलीप झुलवार, सतीश बिडकर, राहुल बोरकर, सिद्धेश्वर केंद्रे, विलास ठावरी, विवेक एरणे, दिलीप चव्हाण, रोशन काकडे, धनंजय छाजेड, प्रवीण मेश्राम यांच्यासह अनेक वीज ग्राहक उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी काँग्रेस आक्रमक; केंब्रिज चौकात आंदोलन,अनेक कार्यकर्त्यांसह खासदार कल्याण काळे ताब्यात

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छ.संभाजीनगर,दि.१५ : शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी काँग्रेस पक्षाने आज केंब्रिज चौकात जोरदार आंदोलन केले. यावेळी खासदार कल्याण काळे यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारने शेतकरी हिताच्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.




काँग्रेसच्या वतीने शेतमालाला हमीभाव, कर्जमाफी,शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी तसेच खताच्या ऑनलाइन नोंदणीची सक्ती बंद करावी,अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. पीकविमा नुकसान भरपाई तसेच इतर शेतकरी हिताच्या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे सांगण्यात आले. आंदोलनात काँग्रेसचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान,पोलिसांनी आंदोलन स्थळी कारवाई करत अनेक कार्यकर्त्यांसह कल्याण काळे यांना ताब्यात घेतले. आंदोलनामुळे परिसरात काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. पोलिस बंदोबस्तात आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात आली. काँग्रेसने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

-------------------------

# नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला जि.प. प्राथमिक शाळा घाटशिरस येथे नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत.



लोकनेता न्यूज नेटवर्क
प्रतिनिधी – संतोष नरवडे
पाथर्डी तालुक्यातील जि.प. प्राथमिक शाळा, घाटशिरस येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. यावेळी नवागत विद्यार्थ्यांची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढून त्यांचे स्वागत करण्यात आले.
कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, बूट तसेच पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी आणि शाळेप्रती आत्मीयता वाढावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.
याप्रसंगी सरपंच गणेश पालवे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. पाठक, अशोक चोथे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.
हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय धाडगे, शिक्षक मिनीनाथ शिंदे, राहुल शेलार, संतोष मोरे, सुनील परभणे, बनकर मॅडम, शिंदे मॅडम आणि बोरुडे मॅडम यांनी विशेष सहकार्य केले.
नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी झालेल्या या स्वागत समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

# अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाला सेलू तालुक्यातून तीव्र विरोध

## “मोर्चाद्वारे निषेध नोंदवून मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले”

**दै.लोकनेता न्यूज नेटवर्क**

परभणी प्रतिनिधी: रमेश मुलगी

परभणी जिल्ह्यातील सेलू येथे महाराष्ट्र शासनामार्फत अनुसूचित जातींमध्ये अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याच्या हालचाली सुरू असून त्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या ‘अनंत बदर समिती’च्या कार्यपद्धतीबाबत जनतेमध्ये तीव्र नाराजी व असंतोष पसरला आहे. या उपवर्गीकरणाला तीव्र विरोध दर्शवण्यासाठी तालुक्यातील समस्त आंबेडकरी, संविधानप्रेमी नागरिक, सामाजिक संघटना आणि अनुसूचित जातीतील बांधवांच्या वतीने मोर्चाच्यामाध्यमातून निषेध नोंदवत उपवर्गीकरण रद्द करण्याची मागणी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे सोमवार १५ जून रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली.
या निवेदनात म्हटले आहे की, संविधानाने अनुसूचित जातींना दिलेल्या एकसंध हक्कांमध्ये विभागणी करून समाजात तेढ, संघर्ष आणि परस्पर अविश्वास निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. अनुसूचित जातीतील ५९ जातींमध्ये भांडण लावून सामाजिक ऐक्याला तडा देण्याचे काम शासनाने करू नये. आरक्षणाचा मूळ हेतू समाजात फूट पाडणे नसून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा आहे. अशा प्रकारच्या उपवर्गीकरणामुळे सलोखा, बंधुता आणि सामाजिक संविधानाच्या समानतेच्या तत्त्वाला बाधा पोहोचू शकते,




अशी भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनाद्वारे अनुसूचित जातीचे आरक्षण अ, ब, क, ड उपवर्गीकरण करण्याचा कोणताही निर्णय तात्काळ मागे घ्यावा, उपवर्गीकरणाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेली ‘अनंत बदर समिती’ तात्काळ रद्द करावी, अनुसूचित जातीतील ५९ जातींमध्ये संघर्ष व भेद निर्माण करणारे सर्व प्रयत्न थांबवावेत, संविधानाने अनुसूचित जातींना बहाल केलेल्या हक्कांचे संरक्षण करून सामाजिक ऐक्य अबाधित ठेवावे, जातीय जनगणना करावी, नोकरीतील अनुसूचित जातीचा अनुशेष तात्काळ भरण्यात यावा व खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करावे.
“या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा.
अन्यथा अनुसूचित जाती, आंबेडकरी समाज आणि बहुजन समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण होऊन राज्यव्यापी लोकशाही मार्गाने आंदोलन उभारले जाईल,” असा इशारा ‘धडक मोर्चा’चे आयोजक व समस्त आंबेडकरी समाज बांधव, सेलू यांच्या वतीने देण्यात आला आहे. यासाठी अशोक अंभोरे, भिमराज गोटे, राहूल जाधव, प्रदिप आकात, विनोद धापसे, उत्तम कांबळे, प्रा. के. डी. वाघमारे, सूरेश सूधीर सावंत, गोविंद दूधवडे, ऋतीक साळवे, सिद्धार्थ साळवे, धारूजी धापसे, रोहन लोखंडे, विलास रणखांबे, साळवे, महेंद्र सावंत, आनंद सिरसाट, अक्षय धाबे, काशीनाथ वाघमारे, शिवाजी वाघमारे, पांडूरंग वाढवे सह आदींनी पूढाकार घेतला.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी पालकांचे आंदोलन;

## “कोल्हा येथील शाळेला पालकांनी ठोकले कुलूप”



***लोकनेता न्यूज नेटवर्क***
परभणी/प्रतिनिधी :- रमेश मुलगीर

मानवत तालुक्यातील कोल्हा येथील जिल्हा परिषद शाळेला ख्याध्यापकांच्या कथित सततच्या गैरहजेरीमुळे आणि प्रतिनियुक्तीवर असलेले शिक्षक शाळेत रुजू न झाल्याच्या निषेधार्थ आंदोलन

मुख्याध्यापकांच्या कथित सततच्या गैरहजेरीमुळे आणि प्रतिनियुक्तीवर असलेले शिक्षक शाळेत रुजू न झाल्याच्या निषेधार्थ संतप्त पालकांनी व शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी सोमवारी दि.१५ जुन शाळेच्या पहिल्याच दिवशी मानवत तालुक्यातील कोल्हा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेला कुलूप ठोकून आंदोलन केले.

कोल्हा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. या शाळेत सुमारे १४८ विद्यार्थी शिक्षण घेत असून मुख्याध्यापकांसह पाच शिक्षकांची पदे मंजूर आहेत. मात्र, गेल्या वर्षभरापासून मुख्याध्यापक नियमितपणे शाळेत उपस्थित राहत नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. तसेच प्रतिनियुक्तीवर असलेले एक शिक्षकही शाळेत कार्यरत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाल्याची तक्रार करण्यात आली आहे.
नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात सोमवारी झाली. मात्र, पहिल्याच दिवशी मुख्याध्यापक आणि प्रतिनियुक्तीवरील शिक्षक अनुपस्थित असल्याचे निदर्शनास येताच पालकांचा संताप अनावर झाला. शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि ग्रामस्थांनी शाळेच्या प्रवेशद्वाराला कुलूप ठोकून निषेध नोंदविला.

यानंतर आंदोलनकर्त्यांनी केंद्रप्रमुख मोहकरे सर यांना निवेदन सादर केले. मुख्याध्यापकांची तात्काळ बदली करण्यात यावी,

प्रतिनियुक्तीवरील शिक्षकाला शाळेत नियमित रुजू करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच मागण्या मान्य न झाल्यास सर्व विद्यार्थ्यांचे शाळा सोडल्याचे दाखले (टीसी) देण्यात यावेत, असा इशाराही पालकांनी दिला आहे.

या आंदोलनामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून शिक्षण विभाग या प्रश्नाकडे कशा पद्धतीने लक्ष देतो, याकडे पालक व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# कडबनवाडीत वीज टंचाईवरून संताप; भारनियमन कमी करण्यासाठी युवकांचे महावितरणला निवेदन!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
इंदापूर ता. प्रति:-राहुल जाधव

इंदापूर: आज दि. १५ जून रोजी कडबनवाडी गावातील वाढत्या भारनियमनामुळे त्रस्त झालेल्या नागरिक, शेतकरी आणि मोठ्या प्रमाणात युवकांच्या वतीने आज महावितरण अधिकाऱ्यांना हक्काचे निवेदन सादर करण्यात आले. शेळगाव येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपकेंद्रात जाऊन युवकांनी अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि गावातील वीज पुरवठा तातडीने सुरळीत करण्याची आग्रही मागणी केली.उन्हाळ्याच्या दिवसांत वीज गायब होत असल्याने दैनंदिन जीवनात नियमित वीज अत्यंत आवश्यक आहे, शैक्षणिक नुकसान ही होत आहे, तसेच शेतीचे मोठे नुकसान होत असून सर्वसामान्य नागरिकांनाही नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महावितरणने या समस्येची गंभीर दखल घेऊन भारनियमनाचा काळ तातडीने कमी करावा, अशी विनंती या अर्जाद्वारे करण्यात आली.



# हदगाव तालुक्याला अखेर मिळाले पुरवठा निरीक्षण अधिकारी; मोनाली भोवरे यांनी स्वीकारला पदभार

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
हदगांव । चंद्रकांत भोरे
गेल्या काही काळापासून रिक्त असलेल्या हदगाव तालुका पुरवठा विभागाच्या पुरवठा निरीक्षण अधिकारी पदावर अखेर नवीन नियुक्ती झाली आहे. नवनियुक्त अधिकारी **मोनाली प्रमोद भोवरे** यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे तालुक्यातील पुरवठा विभागाच्या कामाला आता अधिक गती मिळण्याची चिन्हे आहेत.
**कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार**



मोनाली भोवरे यांनी पदभार

स्वीकारल्यानंतर, हदगाव पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा जाहीर सत्कार केला आणि पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. हदगाव तालुक्यात पुरवठा निरीक्षण अधिकारी पद प्रभारी असल्याने अनेक प्रशासकीय कामांवर याचा परिणाम होत होता. मात्र, आता पूर्णवेळ अधिकारी मिळाल्याने रेशनिंग व्यवस्था, अन्नधान्य वितरण आणि नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण जलद गतीने होईल, अशी आशा नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.
या सत्कार प्रसंगी पुरवठा विभागातील सर्व वरिष्ठ व कनिष्ठ कर्मचारी, लिपिक आणि इतर विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. नवीन अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील पुरवठा साखळी अधिक पारदर्शक आणि गतिमान होईल, असा विश्वास कर्मचाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

# कडबनवाडी क्रिकेट क्लबचा स्तुत्य उपक्रम: चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव

इंदापूर:शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी कडबनवाडी क्रिकेट क्लबने सामाजिक बांधिलकी जपत एक आदर्श उपक्रम राबवला आहे. क्लबच्या वतीने आज, १५ जून रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडबनवाडी येथील इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.
या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला ६ वह्या, १ पेन, १ पेन्सिल, १ पट्टी, १ खोडरबर आणि १ शार्पनर अशा गरजेच्या वस्तू देण्यात आल्या. पहिल्याच दिवशी हे हक्काचे साहित्य मिळाल्याने लहानग्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. क्रीडा क्षेत्रासोबतच गावातील शिक्षणाला बळ देणाऱ्या कडबनवाडी क्रिकेट क्लबच्या या ‘ग्रेट’ कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.
यावेळी कडबनवाडी चे सरपंच (प्रशासक) दादा जाधव, ग्रामपंचायत अधिकारी दादासो गावडे, ऋषिकेश गावडे,कडबनवाडी क्रिकेट क्लबचे सर्व मेंबर, जिल्हा परिषद प्राथमिक कडबनवाडी शाळेचा सर्व शिक्षक स्टाफ, तसेच अधिकारी - पदाधिकारी, शेतकरी, प्रगतशील बागायतदार व ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

# उटी बु. ग्रामपंचायतीच्या उत्कृष्ट कामाबद्दल राज्यस्तरीय मूल्यमापन समितीकडून समाधान व्यक्त!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
जीवन जाधव औसा..

औसा तालुक्यातील उटी बु. : ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ अंतर्गत आज उटी बु. (ता. औसा) ग्रामपंचायतीस राज्यस्तरीय मूल्यमापन गुणवत्ता पडताळणी समितीने प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. ग्रामपंचायतीने राबवलेली विविध विकासकामे आणि शासकीय दप्तराचे उत्कृष्ट नियोजन पाहून समितीने पूर्ण समाधान व्यक्त केले.
राज्यस्तरीय मूल्यमापन गुणवत्ता पडताळणी समितीचे अध्यक्ष मा. श्री. भरत चौगुले सर (कोल्हापूर) व त्यांच्या सहकारी सदस्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा दौरा पार पडला.
याप्रसंगी औसा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (BDO) मा. आनंदकुमार मिरगणे साहेब, सहाय्यक गटविकास अधिकारी (ABDO) मा. शैलेश बिराजदार साहेब, विस्तार अधिकारी मा. पवार साहेब व मा. साखरे साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. विकासकामांची व दप्तराची सखोल पडताळणी
या दौऱ्यादरम्यान समितीच्या वतीने गावामध्ये अत्यंत पारदर्शक व नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आलेल्या विविध शासकीय योजना, पायाभूत सुविधा आणि विकासकामांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात आली. त्याचबरोबर ग्रामपंचायतीचे कार्यालयीन कामकाज आणि शासकीय दप्तराची अत्यंत सखोल व बारकाईने पडताळणी करण्यात आली.
“उटी बु. ग्रामपंचायतीने ठेवलेले दप्तर, पारदर्शक कारभार आणि गावातील विकासकामांचे नियोजन अत्यंत कौतुकास्पद आहे.”
— मा. श्री. भरत चौगुले सर (अध्यक्ष, राज्यस्तरीय समिती)



गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा
मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात उटी बु. ग्रामपंचायतीने घेतलेली झेप आणि केलेले काम पाहून समितीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या कारभाराचे जाहीर कौतुक केले.
समितीने व्यक्त केलेल्या या समाधानामुळे उटी बु. ग्रामपंचायतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण तालुक्यातून ग्रामपंचायतीवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या यशस्वी दौऱ्याबद्दल आणि समितीकडून मिळालेल्या शाबासकीबद्दल सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला असून सर्वांचे आभार मानले आहेत.यावेळी ग्रामपंचायत अधिकारी महेश जगताप सरपंच वैशाली कांबळे उपसरपंच रफिक शेख व सदस्य उटी ग्रामस्थ हजर होते

# कोकण ते मराठवाडा... पावसाच्या तुफान सरी; IMD चा नवा अंदाज आला, या राज्यांनाही अलर्ट

लोकनेता न्यूज नेटवर्क

राज्यात मान्सून दाखल झाला असला तरी अद्याप पावसाला सुरुवात झालेली नाही. मात्र आता उद्यापासून हवामानात बदल होण्याची शक्यता आहे. नैऋत्य मान्सूनची आगेकूच सातत्याने सुरू असून, दक्षिण, ईशान्य, पूर्व आणि मध्य भारतातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्याचबरोबर उत्तर-पश्चिम भारतात सक्रिय असलेल्या पश्चिमी विक्षोभ आणि चक्रीय वाऱ्यांमुळे मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामान विभागाने अनेक राज्यांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. राज्याच्या कोणत्या भागात कसे हवामान असेल याबाबत माहिती जाणून घेऊयात.

उत्तर भारतातील हवामान
जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये मंगळवारी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. डोंगराळ भागांत काही ठिकाणी जोरदार पाऊस पडू शकतो. पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्ली-एनसीआरमध्ये ढगाळ वातावरण राहील. तसेच काही भागात हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे. पश्चिम आणि मध्य उत्तर प्रदेशातही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. या भागांमध्ये ताशी 30 ते 50 किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात.

बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालचे हवामान पूर्व आणि मध्य भारतात मान्सून आणखी सक्रीय होण्याची शक्यका आहे.



त्यामुळे बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि छत्तीसगडच्या अनेक भागांत मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. ओडिशा आणि झारखंडमधील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पूर्व मध्य प्रदेशातही पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. छत्तीसगड आणि आसपासच्या भागांत विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे.

आसाम आणि मेघालयमध्ये मुसळधार पावसाचा इशारा
ईशान्य भारतातील अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. आसाम आणि मेघालयच्या काही भागांत अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सततच्या पावसामुळे नद्यांच्या पाण्याची पातळी वाढण्याची तसेच सखल भागांत पाणी साचण्याची शक्यता आहे.

## खाकीतले पोलीस काका व दिदी बनले विद्यार्थी मित्रांचे संरक्षण कवच

लोकनेता न्युज नेटवर्क
छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छ.संभाजीनगर,दि.१५ : आज जिल्हाभरात शाळेचा पहिला दिवस अत्यंत उत्साहात पार पडला. नवीन वर्ग, नवीन पुस्तके आणि नवीन मित्रांबद्दलच्या कुतूहलाने विद्यार्थी मुलांची पावले शाळेकडे पडत असताना,जिल्ह्यातील ५०८ शाळांच्या आवारात एक अत्यंत भावनिक चित्र पाहायला मिळाले.एरवी खाकी वर्दीला पाहून दुरूनच पळ काढणारी लहान मुले आज त्याच खाकी वर्दीतील पोलीसांशी हसत-खेळत गप्पा मारतांना दिसत होती.
मा.श्री.प्रकाश जाधव,पोलीस अधीक्षक,यांच्या संकल्पनेतून संपूर्ण छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव- २६ चे औचित्य साधून शालेय मुलांशी सलोखा व संवाद साधण्याचे अनुषंगाने पोलीस काका व दिदी उपक्रम राबविण्यात आला आहे. जिल्हा पोलीस दलातील ६० पोलीस अधिकारी आणि ४०४ पोलीस अंमलदारांनी जिल्हयातील ५०८ शाळांना भेटी दिल्या. यामध्ये सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणे प्रभारी अधिकारी, दामिनी पथक यांनी



पोलीस काका व पोलीस दिदी च्या भुमिकेत विद्यार्थ्यांचे अत्यंत दिमाखात स्वागत केले व त्यांच्याशी संवाद साधला आहे. याप्रसंगी मा.प्रकाश जाधव, पोलीस अधीक्षक यांनी स्वत: जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, लाडगाव ता.जि.छ.संभाजीनगर येथे भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत केले आणि त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला.यावेळी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध कलाकृतींची बारकाईने पाहणी करून मुलांमधील सुप्त गुणांचे कौतुक करत त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.
या उपक्रमांतर्गत केवळ स्वागतच करण्यात आले नाही तर सर्व पोलीस काका व दिदी यांनी मुलांशी संवाद साधून त्यांना सुरक्षिततेचे सोप्या व सहज हसत खेळत जाणीव करून दिली.यामध्ये प्रामुख्याने पोलीस हे केवळ गुन्हेगारांसाठी कडक असतात, परंतु चांगल्या आणि प्रामाणिक मुलांचे ते नेहमीच बेस्ट फ्रेंड असतात त्यामुळे पोलिसांना कधीही घाबरू नका, रस्त्यात काही अडचण आली, पत्ता हरवला किंवा कोणी त्रास दिला तर थेट पोलीस काका व दिदी यांची तात्काळ मदत असा ठाम विश्वास मुलांच्या मनात निर्माण करण्यात आला आहे.
त्याचप्रमाणे पोलिसांनी मुलांकडुन डायल ११२ तसेच चाईल्ड लाईन हेल्प क्रमांक १०९८ हे गंमतीशीर खेळातुन तोंडपाठ करून घेतले. संकटसमयी याक्रमांकावर फोन केल्यास पोलीस काका लगेच मदतीला धावून येतील हे त्यांना समजावुन सांगण्यात आले. तसेच अनोळखी व्यक्तींनी कडून चॉकलेट, बिस्किट, खेळणी अशा वस्तु घेवु नये. वडिलांनी किंवा आईने मला पाठविले माझ्या सोबत चल असे सांगणा-या व्यक्ती सोबत अजिबात जाऊ नका असे महत्वाचे धडे मुलांना देण्यात आले आहे. मुलामध्ये वाढत असलेले मोबाईलचे व्यसन हा अत्यंत चिंतेचा विषय असल्याने मुलांना मोबाईलचा अतिवापर केल्याने होणारे दुष्परिणाम बाबत सखोल माहिती देण्यात येवुन गेमिंग किंवा सोशल मीडियाच्या आहारी जाऊ नये तसेच इंटरनेटवर अनोळखी व्यक्तींशी मैत्री करुन स्वत:ची वैयक्तिक माहिती शेअर करु नये याबाबत सायबर सुरक्षेचे महत्व मुलांना सहजतेने पटवुन देण्यात आले आहे.
मा.पोलीस अधीक्षक यांनी नमुद केले कि, पोलीस काका व दिदीच्या स्वरूपात विद्यार्थ्यांना एक भक्कम संरक्षण ढाल देण्याचा आणि त्यांच्या मनातील पोलिसांबद्दलची भीती दूर करून मैत्रीचे नाते निर्माण करण्याचा पोलीस दलाचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. जिल्हयातील प्रत्येक मूल स्वत:ला सुरक्षित अनुभवू शकेल आणि निर्भयपणे वावरून शिक्षण घेईल यासाठी जिल्हा ग्रामीण पोलीस दल हे कटिबध्द आहे. हा उपक्रम फक्त आजच्या पुर्तता मर्यादित राहणार नसुन यानंतर सुध्दा पोलीस काका व पोलीस दिदी हे नियमित शाळांना भेटी देऊन विद्यार्थांशी संवाद साधतील व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या जातील असे निर्देश दिले आहेत. पोलीस काका आणि दिदींनी मुलांशी साधलेला हा आपुलकीचा संवाद पाहून पालक,शिक्षक यांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे.

## औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा व नियमान्वये मे. तोष्णीवाल मेडिकल्सवर कारवाई




लोकनेतान्युज नेटवर्क
नांदेड जिल्हा प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

नांदेड दि. 15 जून:- आज नांदेड शहरातील मे. तोष्णीवाल मेडिकल्स, डॉक्टर्स लेन, नांदेड या पेढीकडून मुदतबाहय औषधाची डॉक्टराच्या चिठठीशिवाय, फार्मासिस्टचे गैरहजेरीमध्ये, विना बिलांने विक्री झाल्याचे स्पष्ट झाल्यामुळे सदरील पेढीविरूध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा 1940 व त्याखालील नियम 1945 अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.

औषध विक्रेत्यांनी डॉक्टरांच्या चिठठीशिवाय फार्मासिस्टचे गैरहजेरीमध्ये विना बिलाने औषधाची विक्री करू नये. डॉक्टराच्या चिठठीवरील औषधी विक्री करतेवेळी विक्री करण्यात येत असलेल्या औषधाचा तपशील व औषधावर नमूद तपशील यामध्ये तफावत आढळून येणार नाही याची त्यांनी गांभीर्याने दक्षता घ्यावी. मुदतबाहय औषधांचे सेवनामुळे रूग्णांचे आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मुदतबाहय औषधी विक्री होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी, असे आवाहन सर्व औषधी विक्रेत्यांना करण्यात आले आहे.

सर्व औषध विक्रेत्यांनी सतर्क राहून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा 1940 व त्याखालील नियम 1945 चे पालन करूनच औषधांची विक्री करावी. कायद्याचे उल्लघंन झाल्यास किंवा त्यांचेविरूध्द या प्रशासनास तक्रारी प्राप्त झाल्यास व सत्यता पडताळणीमध्ये दोषी आढळून आल्यास त्यांचेविरूध्द कडक कारवाई घेण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

नागरिकांनी अशा प्रकारची औषधी विक्री होत असल्याचे आढळून आल्यास, त्यांनी तात्काळ प्रशासनाकडे संपर्क साधावा जेणेकरून संबंधित पेढयाविरूध्द कारवाई करता येईल, असे सहाय्यक आयुक्त औषधे अ.तु.राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## व्यापाऱ्यावर 60 टक्के भाडेवाढ व पन्नास हजार ना परतावा डिपॉझिट सह विविध प्रलंबित मागण्यांसाठी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांचा उपोषणाचा इशारा

**२९ जून रोजी नगर परिषदेसमोर आमरण उपोषण; २५ जूनपर्यंत मागण्या मान्य करण्याची प्रशासनाला मुदत**

दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क
परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी नगर परिषदेच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे वारंवार लक्ष वेधूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करत माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथराव देशमुखौ यांनी २९ जून २०२६ रोजी नगर परिषद कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे. याबाबतचे निवेदन मुख्याधिकारी, नगर परिषद परळी यांना देण्यात आले असून २५ जूनपर्यंत मागण्या मान्य करून लेखी कळविण्याची मागणी करण्यात आली आहे.
निवेदन देण्यापूर्वी तब्बल परळी नगरपालिकेचे मुख्य अधिकारी यांच्या सोबत पाच तास प्रदीर्घ सर्व विषयावर चर्चा करण्यात आली आहे.



देशमुख यांनी दिलेल्या निवेदनात परळी शहरातील व्यापारी, पत्रकार, बौद्ध समाज, कंत्राटी कामगार तसेच विविध सार्वजनिक प्रश्नांशी संबंधित सात महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. नगर परिषदेकडून व्यापाऱ्यांवर लादण्यात आलेली भाडेवाढ व अनामत रक्कम रद्द करावी, पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी मंजूर जागा पत्रकारांनाच देण्यात यावी, मराठा भवनासाठी दिलेल्या जागेबाबत स्पष्ट माहिती द्यावी, भीमनगर येथील प्रलंबित बुद्ध विहाराचे काम तातडीने सुरू करावे, छत्रपती संभाजी चौकाचे सुशोभीकरण करावे, सरस्वती नदीवरील अतिक्रमणे हटवून संबंधित कामांची चौकशी करावी तसेच स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन शासन निर्णयानुसार ऑनलाईन पद्धतीने अदा करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

निवेदनात देशमुख यांनी नमूद केले आहे की, यापूर्वी अनेक वेळा निवेदने व विनंत्या करूनही नगर परिषद प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे. प्रशासनाने २५ जूनपर्यंत मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न घेतल्यास दि. २९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून नगर परिषद कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी परळी, तहसीलदार परळी तसेच शहर व संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

या उपोषणाच्या इशाऱ्यामुळे परळी शहरातील विविध प्रलंबित प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आले असून नगर परिषद प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## लामजना पाटी लातूर जाणाऱ्या जावळी गावातील महापुरुष महामार्गावर दुभाजक व नलिकाम अर्धवट...

लोकनेता न्यूज नेटवर्क
जीवन जाधव औसा

छत्रपती शिवाजी महाराज चौक लामजना पाटी ते संतश्रेष्ठ बसवेश्वर महाराज चौक लातूर या महापुरुष महामार्गाचे काम अत्यंत संथगतीने सुरू असून गेल्या दोन वर्षापासून सिमेंट रस्त्याचे काम सुरू असून अद्यापही त्या रस्त्याचे काम पूर्ण झाले नसून रस्त्याच्या बाजूचे साईड पट्टी काम व रस्त्याच्या मध्यभागी असणारे डिव्हायडर तथा पाण्याच्या प्रवाहासाठी नाली काम झालेले नसून रस्त्यावरील व रस्त्याच्या बाजूला थांबलेले पावसाचे पाणी नागरीकांच्या घरात जात आहे. लामजनापाटी ते जावळी ते लातूर या महापुरुष महामार्गावर अनेक अपघात होत असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे तर बरेच जण जखमी झालेले आहेत. या रस्त्यावर असणाऱ्या जावळी गावांमध्ये जि. प. प्राथमिक शाळा व जि. प. प्रशाला अशा दोन शाळा असल्यामुळे शाळकरी लहान मुले रस्ता ओलांडून शाळेकडे जातात त्यामुळे जावळी गावात गतिरोधक बसवण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.
तरी या कामाची उच्चस्तरीय चौकशी लावून लवकरात लवकर काम पूर्ण करून देण्याची मागणी ग्रामस्थातून होत आहे.




## पल्स पोलिओ, स्टॉप डायरिया मोहिम यशस्वी करा : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**28 जुन रोजी 2 लाख 53 हजार बालकांना देण्यात येणार पोलिओची मात्रा**

दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क
डॉ. ज्ञानेश्वर जगताप जालना,

दि.15(जिमाका) : जिल्हास्तरीय पल्स पोलिओ मोहिमेची सभा जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनामध्ये संपन्न झाली. पल्स पोलिओ मोहिमेसाठी सुक्ष्मकृती आराखडयाचे काटेकोरपणे पालन करुन एकही 0 ते 5 वर्षे वयोगटातील एकही बालक पल्स पोलिओ मधुन वंचित राहणार नाही असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. पल्स पोलिओ मोहिम अंतर्गत जालना जिल्हयातील 0 ते 5 वयोगटातील 2 लक्ष 53 हजार बालकांना पोलिओची मात्रा रविवार,



28 जुन रोजी देण्यात येणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी सांगितले. स्टॉप डायरिया मोहिम अंतर्गत 5 वर्षाखालील बालकांना ओ.आर.एस. व झिंक टॅबलेट घरोघरी जाऊन देण्यात येणार आहे. यामध्ये ओ.आर.टी.कॉर्नर स्थापन करण्याचे निर्देश मा.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी पल्स पोलिओ, स्टॉप डायरिया, एच.पी.व्ही.लसीकरण, गोवर व रुबेला दुरीकरण मोहिम विषयी माहिती दिली.
एच.पी.व्ही.लसीकरण वाढविणे त्यासाठी शाळांना भेटी देणे. ई-संजीवनी ओ.पी.डी. वाढविणे. महात्मा फुले जन आरोग्य योजनांचा लाभ ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी द्यावा. रुग्णांना चांगली आरोग्य सेवा देऊन रेफर करणे शक्यतो टाळावे. आपल्या आरोग्य संस्था नियमित स्वच्छ असाव्यात. तालुका आरोग्य अधिकारी यांनी आपल्या पी.एच.सी.ला नियमित भेटी देऊन सर्व आरोग्य उपक्रमांचा आढावा घेऊन स्वच्छता पाहणी करण्याचे निर्देश दिले.
यावेळी डॉ.जयश्री भुसारे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकीत्सक, डॉ.तरुणा छाबडा अध्यक्ष इंडियन असोसिएशन ऑफ पीड्रीयाट्रिक, डॉ.बळीराम बागल अध्यक्ष आयएमए, डॉ.शुंभागी मिसाळ प्रपाठक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय डॉ.श्रीकांत देसाई माता बाल संगोपन अधिकारी, डॉ.एन.जी.पवार साथरोग अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
-*-*-*-*-*-*----

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)